**पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका विशेष पर्यटन क्षेत्र घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : टीडीसी २०१७/३/प्र.क्र. २९८/पर्यटन,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २१ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टीडीएस २०१५/११/प्र.क्र. १०२१/ पर्यटन, दिनांक ४.५.२०१६.

**<u>प्रस्तावना</u> :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला तसेच ऐतिहासिक किल्ले, लेण्या, प्रसिध्द मंदिरे, समाधीस्थळे, देवराया, घाट, धबधबे, प्रसिध्द नद्या, धरणे, विहीरी, खिंडी, ऐतिहासिक वास्तू, घंटासारखे वाजणारे दगड, खोडद येथील जागतिक महादुर्बीण, आर्वी येथील विक्रम दळणवळण उपग्रह, पठारे, खाई, माणिकडोह येथील कुकडी नदीतील रांजण खाचखळगे, बोरीगांवातील भूकंप झालेल्या उद्रेकाची राख, प्रसिध्द कारखाने, कृषी पर्यटन केंद्र, तमाशा पंढरी नारायणगांव, चातो इंडेज चौदानंबर येथील आशियातील पहिली वाईनरी, माणिकडोह येथील बिबट्या निवारण केंद्र, खाद्यसंस्कृती, नैसर्गिक पूल, बेल्हे गावाचा ३५० वर्षे परंपरा असलेला आठवडे बाजार, १५० वर्षे परंपरा असलेला श्री क्षेत्र आणे उत्सव, अशा पर्यटन विकासासाठी आवश्यक असणारे बहुविविध नैसर्गिक सौंदर्य, तसेच चाली रिती, रूढी परंपरा, कला, संस्कृती, त्याचप्रमाणे ऐतिहासिक, नैसर्गिक व पारंपारिक वारसा लाभलेला पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका पर्यटन क्षेत्र तालुका म्हणून घोषित करण्याबाबतची विनंती शासनास प्राप्त झाली होती.

शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टीडीएस २०१५/११/प्र.क्र. १०२१/ पर्यटन, दिनांक ४.५.२०१६ च्या परिच्छेद- ४, ४.१, तक्ता- १ मधील अनुक्रमांक- ४ येथील विशेष पर्यटन जिल्हे/ प्रदेश यांचा विकास, यामधील क्रमांक- २ मध्ये आवश्यकता वाटेल तसे इतर विशेष पर्यटन प्रदेश/ इस्टेट राज्याकडून सूचित केले जातील अशी तरतूद आहे. या तरतुदीनुसार पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबतची विनंती शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्याची क्षेत्र/ प्रदेशाची पर्यटनदृष्ट्या पुढील वैशिष्ट्ये आढळून येतात :-

१) छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यासह निसर्ग सौंदर्याने नटलेले सात किल्ले, सर्वाधिक ३५० लेण्या असलेला जुन्नर हा एकमेव तालुका आहे.

२) या तालुक्यात अष्टविनायकांपैकी (i) गिरीजात्मक - लेण्याद्री व (ii) विघ्नेश्वर - ओझर ही दोन अष्टविनायक मंदिरे आहेत. येथे हेमाडपंथी बांधणीतील कोरीव ३ पुरातन मंदिरे आहेत. या क्षेत्रात तीन समाधी मंदिरे आहेत. याशिवाय इतर महत्वाची मंदिरे आहेत.

३) या क्षेत्रात नाणेघाट- घाटघर, दार्याघाट, आणेघाट- आणे असे निसर्गरम्य घाट व प्रसिध्द धबधबे आहेत.

४) या क्षेत्रात नद्यांची उगमस्थाने आहेत. तसेच जागतिक महादुर्बिण, आर्वी येथील दळणवळण उपग्रह- विक्रम, विविध पठारे, गिर्यारोहकांना आव्हान देणारे दोन ते तीन हजार फूट खोल असलेले कोकणकडे, माणिकडोह गावातील कुकडी नदी, पुरातन काळात भूकंप झालेल्या उद्रेकाची राख, कृषी पर्यटन केंद्रे, नारायणगांव हे तमाशाची पंढरी असलेले गांव, आशियातील सर्वात पहिली

वायनरी, बिबट्या निवारण केंद्र, खाद्य संस्कृती, नैसर्गिक पूल, प्राचिन परंपरा असलेला आठवडा बाजार आहेत.

२. पर्यटन धोरण २०१६ च्या परिच्छेद ४.१ मधील अनुक्रमांक-४ नुसार "शासनास आवश्यकता वाटेल तसे इतर विशेष पर्यटन प्रदेश/ इस्टेट राज्याकडून सूचित केले जातील", अशी तरतूद आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्याला पर्यटन विकासासाठी नैसर्गिकरित्या लाभलेले वैभव तसेच वर नमूद वैशिष्ट्ये विचारात घेऊन शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टीडीएस २०१५/११/प्र.क्र. १०२१/पर्यटन, दिनांक ४.५.२०१६ च्या परिच्छेद- ४, ४.१, मधिल तरतुदीनुसार "जुन्नर तालुक्याला विशेष पर्यटन क्षेत्र" म्हणून या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात येत आहे .

३. या पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही पर्यटन संचालनालय/ पर्यटन विभागामार्फत करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११११३५०९४१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae5e5678dc8c9d9c01f7043448a53f6a9fbe81e46d183af43c9a9e01eb42c7c7, serialNumber=93c11f919f0c5fba6953b4841cc8cfd46b2b788da139e3f21b3d79d2cf976efa, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2018.03.21 11:36:43 +05'30'

(र. ल. लखोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव.
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद.
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा.
८. महाराष्ट्रातील सर्व मा.लोकसभा सदस्य.
९. महाराष्ट्रातील सर्व मा.राज्यसभा सदस्य.
१०. सर्व मा.विधान परिषद सदस्य.
११. सर्व मा.विधान सभा सदस्य.
१२. मा.मुख्य सचिव.
१३. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
१४. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१६. विभागीय आयुक्त, पुणे.
१७. जिल्हाधिकारी, पुणे.
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
२०. जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे.
२१. सर्व मंत्रालयीन विभाग.
२२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व कार्यासने.
२३. निवडनस्ती (पर्यटन).